# जनसुनावणीचे इतिवृत्त

मे. सागर रेशम को. ओ. हौ. सो. लि. , सी.टी.एस. नं. ८६४अ, ८६४ ब, ८६५, ८६६अ/१ व ८६६अ/२, विलेज बांद्रा, बायरामजी जीजीभोय रोड, बांद्रा (प.), मुंबई या नियोजित इमारत पुनर्बांधकाम प्रकल्पाच्या जनसुनावणी प्रस्तावाबाबतची जाहिर जनसुनावणी दिनांक ०९/०८/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर, शासकीय वसाहत बांद्रा (पुर्व), मुंबई- ४०० ०५१ येथे आयोजित करण्यात आली होती. सदर जनसुनावणीसाठी खालील शासकीय अधिकारी उपस्थित होते.

१) **श्री.राजेंद्र बोरकर** - **अध्यक्ष**
निवासी उपजिल्हाधिकारी,
व अप्पर जिल्हादंडाधिकारी
मुंबई उपनगर.

२) **श्री. सतीश पडवळ** - **आयोजक**
उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, मुंबई-२

३) **डॉ. जि. बा. संगेवार** - **सदस्य**
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, मुंबई.

**जनसुनावणीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे** –

सर्वप्रथम श्री. सतीश पडवळ, उप-प्रादेशिक अधिकारी यांनी सर्वांचे स्वागत करुन मा. अध्यक्षांच्या परवानगीने जनसुनावणीस सुरुवात केली. आजची जनसुनावणी ही भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, दिल्ली यांच्या अधिनियम २००६ व सुधारीत २००९ तसेच जनसुनावणी सागरी तटीय विनियमन अधिनियम २०११ चे कलम क्र. ८ (व्ही) (डी) (सी) ४ शुध्दीपत्रक ६ जानेवारी २०११ मधील तरतुदी नुसार घेण्यात येत आहे असे सांगितले. सदर प्रकल्प धारकाने म.प्र.नि. मंडळाकडे पर्यावरण विषयक जाहीर सुनावणीसाठी प्रस्ताव दिनांक ०९/०५/२०१८ रोजी सादर केला. तद्नंतर मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक ०९/०८/२०१८ रोजी पर्यावरण विषयक जनसुनावणी घेण्याची तारीख निश्चित केली होती. सदर जाहीर जनसुनावणीची जाहिरात एक महिना अगोदर "दै. नवशक्ती" मराठी वर्तमान पत्रात तसचे "दै फ्रि प्रेस जर्नल" या इंग्रजी वर्तमानपत्रात दि. ०४/०७/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. त्याअनुषंगाने आजची पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजीत करण्यात आलेली आहे.

सदर प्रस्तावीत प्रकल्पाच्या प्रवर्तकांनी तयार केलेल्या पर्यावरण विषयक अहवालाच्या प्रती खालील ठिकाणी भाडेकरू/ रहिवाशी यांच्या अभ्यासासाठी ठेवण्यात आल्या होत्या –

१) जिल्हाधिकारी मुंबई उपनगरे, जिल्हाधिकारी कार्यालय, प्रशासकीय इमारत, १० वा मजला, शासकीय वसाहत, बांद्रा (पुर्व),मुंबई- ४०० ०५१.

२) पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, १५ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत, मंत्रालय, मुंबई.

३) सह संचालय (जल प्रदुषण नियंत्रण), मुख्यालय, मप्रनि मंडळ, सायन, मुंबई.

४) प्रादेशिक अधिकारी, मुंबई/उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई-२, मप्रनि मंडळ, रायकर चेंबर्स, ए विंग, २१६, २रा मजला, देवनार गाव रोड, जैन मंदिर जवळ,गोवंडी(पू.) मुंबई.

५) सहाय्यक आयुक्त, एच/डब्लू वार्ड, ऑफीस बिल्डींग, सेंट मारटिन रोड, बांद्रा पोलीस स्टेशन बाजुला, बांद्रा(प), मुंबई-५०

श्री. सतीश पडवळ, उप-प्रादेशिक अधिकारी व आयोजक यांनी सांगितले की या जनसुनावणीचा उद्देश भाडेकरू/ रहिवाशी यांना प्रस्तावित प्रकल्पाविषयक माहिती देणे, प्रकल्पामुळे पर्यावरणावर काय परिणाम होईल व त्यावर करावयाच्या उपाय योजना यांची माहिती देणे हा आहे. पुढे ते म्हणाले की सर्वप्रथम प्रस्तावित प्रकल्पाचे सल्लागार प्रकल्पाविषयीची माहिती सादर करतील व त्यानंतर भांडेकरु/ रहिवाशी यांनी त्यांचे सदर प्रस्तावित प्रकल्पाबाबत आक्षेप, तक्रारी, सुचना मांडाव्यात व त्याची नोंद इतिवृत्तात घेऊन ते पुढे महाराष्ट्र सागर तटीय व्यवस्थापन प्राधिकरण, मंत्रालय, मुंबई यांना पाठविले जाईल. तसेच या समितीचे काम जनसुनावणी घेणे, भाडेकरू/रहिवासी टिका, टिप्पणी यांची नोंद घेवून त्याचा अहवाल शासनाला सादर करणे असा आहे व प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी माहिती देण्याची सूचना केली.

यानंतर श्रीमती. प्राची म्हसकर यांनी सदर प्रकल्पाबाबत विस्तृतपणे स्लाईड शो द्वारे सादरीकरण केले. सदर सादरीकरणामध्ये त्यांनी प्रकल्पाचे गुगल अर्थ वरून स्थान, आयकर नकाशामधील व जुन्या सी.झेड.एम.पी. १९९१ मधील स्थान दाखवुन प्रकल्पाच्या स्थळाची माहिती

दिली.प्रकल्पासंबधीत सीआरझेड अधिसूचना २०११ कलम जसे, प्लॉट झोन, आसपासच्या निवासी आणि व्यावसायिक विकास याबाबत माहिती दिली.

सदर प्रस्तावित प्रकल्प् - १ तळघर + तळमजला + मधला मजला + वरील १ ते १९ रहिवाशी मजले अशी प्रस्तावित इमारत आहे. एकूण भूखंड ११४१.६० चौ.मी. आहे आणि हा भुखंड सीआरझेड-II च्या अंतर्गत येतो. तसेच इमारतीचे प्लॅन लेआउट आणि पार्किंगविषयी तपशील आणि निवासी सदनीकांचा तपशील, तपशीलवार मांडणी आराखडा, आणि निवासी नकाशाचा तपशील दिले आहेत.

एकूण बांधकाम क्षेत्रफळ अंदाजे ३६९८.४२ चौ.मी. इतके असून त्याची उंची ६९.९५ मीटर आहे. प्रकल्प खर्च हा साधारणत: ९६.२१ करोड इतका असेल. तसेच बांधकाम पुर्ण झाल्यानंतर पाण्याची आवश्यकता राहील व ती १६.३८ घन मीटर/प्रति दिन एवढी असेल आणि एकूण सांडपाणी पाणी निर्मिती १५.३१६ घन मीटर/प्रति दिन एवढी असेल. सांडपाणी पाणी प्रक्रिया केंद्र हे १९.० सीएमडीचे असेल. प्रक्रियाकृत सांडपाणी बागकामासाठी व फ्लशिंगसाठी वापरण्यात येईल व निघणारे सांडपाणी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मलवाहिनीमध्ये पुढील प्रक्रियेसाठी सोडण्यात येईल. सदर प्रकल्पातुन निर्माण होणा-या घन कच-याचे वर्गीकरण सुका व ओला कचरा असे करण्यात येईल व ओला कचरा खतनिर्मितीसाठी वापरण्यात येईल.

सादरीकरणाच्या शेवटी सल्लागाराने प्रकल्प प्रवर्तकाकडून इतर प्रस्तावित पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती देऊन सादरीकरण समाप्त केले.

तद्नंतर अध्यक्षांनी उपस्थित रहिवासी यांना प्रकल्प प्रवर्तकाने पर्यावरण विषयक केलेल्या सादरी करणाच्या अनुषंगाने काही शंका, टिका, टिप्पणी आपण या ठिकाणी तोंडी अथवा लिखित स्वरुपात सादर करण्याची विनंती केली. सदर प्रश्नांच्या अनुषंगाने प्रकल्प प्रवर्तक त्यावर करण्यात येणा-या उपाय योजनांच्या बद्दलची माहिती देतील असे नमुद केले.

**प्रश्नोत्तरे**

**१. डॉ. जि. बा. संगेवार, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मं,मुंबई**

**प्रश्न-** **ओला कचरा विल्हेवाटीसाठी कोणत्या उपाययोजना करण्यात येणार आहेत ?**

**उत्तर:-** **प्रकल्प सल्लागारांने असे सांगितले ओला कचरा विल्हेवाटीसाठी ऑरगॅनीक वेस्ट कन्वर्टर बसविण्यात येईल.**

शेवटी जन सुनावणी समितीच्या अध्यक्षांनी सांगितले की उपस्थितांनी मांडलेले मुद्दे, टीका, टिप्पणी यांची नोंद घेण्यात आलेली असुन आजच्या जनसुनावणीचे इतिवृत्त, व्हिडिओ, सी.डी. व आपली निवेदने ही पुढे महाराष्ट्र सागर तटीय व्यवस्थापन प्राधिकरण, मंत्रालय, मुंबई यांना पाठविले जाईल असे सांगितले.

तदनंतर सदर प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणीसाठी सर्वांनी उपस्थित राहून आपली मते मांडून जनसुनावणी शांततेने पार पाडल्याबद्दल उपस्थितांचे आभार मानले व त्यांनी जनसुनावणी यशस्वी संपन्न् झाल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| (डॉ. जि. बा. संगेवार)<br>प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, मुंबई,<br>सदस्य्<br>जनसुनावणी समिती | (श्री. सतीश पडवळ)<br>उप-प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, मुंबई-२<br>आयोजक<br>जनसुनावणी समिती | (श्री.राजेंद्र बोरकर )<br>निवासी उपजिल्हाधिकारी,<br>व अप्पर जिल्हादंडाधिकारी,<br>मुंबई उपनगर जिल्हा<br>जनसुनावणी समिती. |